# तरुण भारत

सातारा

www.tarunbharat.com

₹ ५.०० रविवार दि. ६ जानेवारी २०१९ बेळगाव • गोवा •



डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव


# डी. पी. भोसले कॉलेजचे नेत्रदीपक यश

## वाशी येथे झालेल्या रयत विज्ञान परिषदेत दोन विद्यार्थ्यांची कामगिरी

**वार्ताहर**
कोरेगाव

वाशी येथे रयत शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित चौथ्या रयत विज्ञान परिषदेत डी. पी. भोसले कॉलेजमधील ज्युनिअर विज्ञान गुरूकुल प्रकल्पातील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले.

सृष्टी नारायण माने व ओंकार महेंद्र नलवडे यांनी अनुक्रमे वीक सॉईल एरीगेशन व लाँग लास्टींग मिल्क या संकल्पनेस प्रथम व तृतीय क्रमांक मिळविला. या यशस्वी विद्यार्थ्यांचा भाभा ऑटोमिक रिसर्च सेंटरचे शास्त्रज्ञ डॉ. श्रीकुमार बॅनर्जी यांच्या हस्ते, रोख रक्कम ५००० रूपये व सांयटीफिक कीट देऊन सत्कार करण्यात आला.

ज्युनिअर इन्स्पायर विभागात अनिरूध्द व हणमंत पवार, श्रेया प्रकाश पवार, दिव्या बाबुराव भोसले, वैष्णवी वैभव बर्गे व गायत्री हिम्मत घाडगे यांनी तयार केलेल्या डीग्रेडेबल बायो प्लास्टिक या उपक्रमास प्रथम क्रमांक मिळला. या विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मानचिन्ह देऊन रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्रिं. डॉ. भाऊसाहेब कराळे यांच्याहस्ते करण्यात आला. या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एस. डी. जाधव, प्रा. एस. ए. सोळसकर व प्रा. एस. टी. शेडगे यांचे मार्गदर्शन मिळाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांचे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सहसचिव प्रिं. डॉ. विजयसिंह सावंत तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.



कोरेगाव : यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत डॉ. जाधव, प्रा. सोळसकर आदी.